# <u>बृहन्मुंबई महानगरपालिका</u>

**<u>(घन कचरा व्यवस्थापन, आर/मध्य विभाग.)</u>**

सहा.अभि./आर-मध्य/2571/घकव्य दि.16.07.2026

## <u>स्वारस्य अभिव्यक्ती जाहिरात</u>

विषय:-आर/मध्य विभागातील स्मशानभूमी मधील दैनंदिन साफ़सफ़ाईच्या कामाकरीता बहुउद्देशीय कामगार कंत्राटी तत्वावर घेण्याकरीता संस्थेची नेमणुक करणे बाबत.

आर/मध्य विभागातील स्मशानभुमीमध्ये दैनंदिन रखरखाव व साफ सफाईच्या कामकाजाकरीता कंत्राटी तत्वावर बहुउद्देशीय कामगार पुरविण्याबाबतच्या कामाचा 1 वर्षाचा अनुभव असणा-या अशासकीय संस्थेची / कंपनीची नेमणुक करणेसाठी महानगरपालिकेच्या हद्दीमधील भविष्य निर्वाह निधी व राज्य कर्मचारी विमा योजनेमध्ये नोंदणीकृत असणा-या अशासकिय संस्था, खाजगी कंपनी इ. संस्थाकडुन त्यांची पात्रता यादी तयार करुन सोडत पद्धतीने निवड करण्यासाठी अर्ज मागवीत आहे.

अर्जाचा नमुना आर/मध्य विभाग कार्यालयातील सहाय्यक अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) यांचेकडे रु.3993/- अधिक 18 टक्के वस्तू व सेवा कर रोख स्वरुपात भरुन दि.17.07.2026 ते दि. 24.07.2026 सकाळी 10.00 ते दुपारी 01.00 या वेळेत विकत मिळु शकेल. पात्र संस्थांच्या यादीमधुन सोडत पद्धतीने यशस्वी झालेल्या संस्थांना कामाचे वाटप योजनेच्या अटी व शर्तीनुसार आर/मध्य विभागाचे सहाय्यक आयुक्त करतील.

इच्छूक संस्थांनी अधिक तपशिल, अर्ज व शपथपत्राच्या नमुन्यासाठी आर/मध्य विभाग घन कचरा व्यवस्थापन कार्यालयात संपर्क करावा किंवा महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेत स्थळावर भेट द्यावी. संस्थेने आर/मध्य विभाग कार्यालयात अर्ज करण्याची अंतिम तारीख  दि.24.07.2026 (दुपारी 03.00 वाजेपर्यंत).

नमूद केलेल्या कार्यालयीन कालावधी नंतर दाखल करण्यात आलेले अर्ज विचारात घेण्यात येणार नाहीत.

सही/-16.07.2026

सहाय्यक अभियंता (घ.क.व्य.)

आर/मध्य विभाग